संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# वस्तुसेवा कराचे दर आणि परवडणारे घर

उशिरा जाग येणे हे सरकारीपणाचे जन्मसिध्द लक्षण ठरते. केंद्र सरकारने बांधकाम सुरु असलेल्या घरांवरचा वस्तुसेवा कर तब्बल बारा टक्क्यांवरून पाच टक्क्यावर खाली आणला आणि ही गोष्ट लक्षात यायला तब्बल पावणेदोन वर्षे जावी लागली. अन्न, वस्त्र, निवारा या जर समाजाच्या मूलभूत गरजा असतील तर त्या सहजपणे आणि परवडणाऱ्या दरात कशा उपलब्ध होतील असाच विचार व्हायला हवा. परंतु सरकारने निवारा काय, अन्न काय आणि अगदी पाणी काय या सर्वांवरचा वस्तु सेवा कर दहा टक्क्यांपासून २८ टक्क्यांपर्यंत ठेवला होता. लोकांना जसजसा त्याचा त्रास होऊ लागला. तशतशा त्याविरुध्दच्या तक्रारींची तीव्रताही वाढली. गेली काही वर्षे बांधकाम क्षेत्रे लडखळलेले आहे. तर यापूर्वी हॉटेलमधले कुठलेही खाणे म्हणजे खिशाला झणझणीत फोडणी देण्यासारखे होते. अनेक लोक आपली खाण्याची भूक पाण्यावर भागवू लागले. कारण पाण्यासाठीसुध्दा किंमत मोजण्याची वेळ लोकांवर आली होती. ही सगळी परिस्थिती लोकांचा अंत पाहाणारीच होती. एकीकडे २०२२ पर्यंत प्रत्येकाला घरे उपलब्ध करून देण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती. परंतु प्रत्यक्षात या वस्तु सेवा कराच्या निर्बंधावर घरांच्या किंमती अपेक्षेप्रमाणे खाली येत नव्हत्या. उलट काही ठिकाणी असे झाले की घरांच्या किंमती खाली आल्या. पण बिल्डरांनी वस्तुसेवा कराचा बोजा हा घर घेणाऱ्यांच्या डोक्यावर टाकला. स्वाभाविकपणे तीस चाळीस लाख किंमतीच्या घराकरीता तीन तीन लाख रुपये वस्तु सेवा कराचा भार लोकांना सहन करावा लागला. याचा परिणाम असा झाला की लोकांना परवडणारीही घरे मिळाली नाहीत आणि बिल्डरांना अपेक्षेप्रमाणे घरविक्रीही करता आली नाही. देशभरामध्ये रेरा किंवा महाराष्ट्रात महारेरासारखा कायदा लागू झाल्याने घरांच्या किंमती बऱ्यापैकी लागू झाल्या परंतु वस्तुसेवाकराचा फेरा इतका जबरदस्त होता की सामान्य माणसाची घर घ्यावे की घेऊ नये अशी द्विधा मनस्थिती होऊ लागली त्याला असे वाटत राहिले की आणखी काही दिवसांनी घरांच्या किंमती खाली येतील. परंतु हे प्रत्यक्षात आले नाही. आता जेव्हा यावर्षीचे अंदाजपत्रक सादर झाले त्यामध्ये वस्तुसेवा कर कमी केला जाईल असे आश्वासन दिले गेले.

### बिल्डर लॉबीची नफेखोरी

घरांवरचा वस्तुसेवा कर यापूर्वीच कमी करता आला असता. परंतु सरकारला जसे उशिरा जाग येते हे उत्तम उदाहरण असते तसेच ते राजकीय डावपेचाचेही नमुने असतात. आता लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर बिल्डरांना दिलासा देण्याचा निर्णय सरकारने जाणीवपूर्वक घेतला आहे त्यातून सामान्य माणसाला दिलासा मिळेल हा केवळ योगायोग ठरू शकतो. कारण सामान्य माणसाची जर खरोखरच एवढी काळजी असती तर अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या मूलभूत वस्तुंवर हा कर आकारताना दहावेळा विचार केला गेला असता किंवा गेल्या वर्षभरापासून अनेक ग्राहक संघटनांनी आणि बिल्डर लॉबीने घरांवरचा वस्तुसेवा कर रद्द करावा अशी मागणी केली होती. परंतु सरकारने त्याची दखल घेतली नाही. आता जेव्हा निवडणुकांच्या तोंडावर जेव्हा निवडणूक निधीचीही टंचाई भासू लागली असेल तेव्हा बिल्डरांना खुश करण्याचा हा निर्णय सरकारने घेतला आहे अशी कोणालाही सहजपणे शंका येऊ शकते. यातला सरकारी कारभाराचा बेजबाबदार प्रकार आणखीनच मजेशीर ठरतो. सरकारने ही घरे लोकांना परवडावीत म्हणून त्याला परवडणारी घरे असे नाव दिले. ज्याचे वारंवार अफोर्डेबल हौसिंग असे वर्णन केले गेले. कारण या परवडणाऱ्या घरांवरही दहा टक्क्यापेक्षा जास्त वस्तुसेवा कर लावण्याचा अफलातून प्रयोग पाहायला मिळाला आणि आता बांधकाम सुरू असलेल्या घरांवरच परवडणाऱ्या घरांवरचा वस्तुसेवा कर मोठ्या प्रमाणात कमी केला आहे. परवडणारी घरे असे त्याचे वर्णन करताना वस्तु सेवा करामुळे हीच घरे सामान्य माणसाला न परवडणारी ठरली होती. सामान्य माणसाच्या उत्पन्नात कोणतीही लक्षणीय वाढ होत असताना तो ही परवडणारी घरेही घेऊ शकत नव्हता. अर्थातच अनेक ठिकाणी या परवडणाऱ्या घराच्या योजनांचा अनेक बिल्डरांनी लाभ करून घेतला .

### महाराष्ट्रात मुद्रांक शुल्कात वाढ

वस्तुसेवा कराच्या प्रयोगाचे हे नाटक किती अंकी आहे हे समजायला मार्ग नाही. कारण गेल्या पावणेदोन वर्षामध्ये अनेकवेळेला वेगवेगळ्या वस्तूंवर करकपात केली गेली. अजूनही औषधे , शिक्षण, किंवा आरोग्य सेवा , प्रवास अशा सर्वसामान्य माणसाच्या रोजच्या जीवनाशी संबंधित अनेक वस्तू आणि सेवांवरचे कर कमी करावे लागणार आहेत. त्याबाबत सरकारला आपली राजकीय सोय पाहून निर्णय घेतले जातील. शेवटी वस्तू आणि सेवा असे जरी त्याचे नाव असले तरी त्यामध्ये कपात करताना योग्य त्या संधींचीच वाट पाहिली जाते किंवा योग्य ती संधी पाहूनच कपात केली जाते. म्हणूनच केंद्र सरकारने आता केलेली ही कपात नेहमीप्रमाणे उशिरा सुचलेल्या शहाणपणासारखी आहे. यातून घरांच्या किंमती खाली येतील अशी जी काही भविष्यवाणी केली जात आहे ती कितपत खरी होईल याबद्दल शंका वाटू लागते. कारण बिल्डर लॉबी इतक्या सहजासहजी ग्राहकांना दिलासा देत नाही. ते आता घरांच्या मुळ किंमतीतच वाढ करतील आणि आपला नफा कायम ठेवण्याचा प्रयत्न करतील. केंद्र सरकारने एकीकडे वस्तुसेवा करता कपात केली असताना महाराष्ट्र सरकारने मुद्रांक शुल्क म्हणजेच स्टँप ड्युटीत वाढ केली आहे अर्थसंकल्प सादर होण्याच्या काही दिवस आधी मुद्रांक शुल्कातील ही वाढ सामान्य माणसाचे कंबरडे मोडणारीच ठरू शकते आणि याचा अर्थ मुंबईसारख्या जागेची टंचाई असलेल्या महानगरात घरांच्या किंमती मोठ्या प्रमाणावर खाली येतील, असा दावा करण्यातही काही अर्थ राहात नाही.